Research Papers

गांधीजींचे मजूर विषयक विचार

किशोर जनार्दन लांडेपाटील
हुतात्मा राजगुरू महाविदयालय
राजगुरूनगर, ता.खेड, जि.पुणे
410505

प्रस्तावना :–

भारतात औद्योगिकरणास उशीरा सुरूवात झाली. औद्योगिकीकरणाबरोबर येथे नागरीकरणालाही सुरूवात होऊन अनेक सामाजिक प्रश्न निर्माण होऊ लागले. निर्माण झालेल्या कामगार वर्गातही अनेक समस्यां होत्या. भारतीय स्वातंत्र्य चळवळ यावेळी विस्तारीत होत होती. या चळवळीचे नेते विद्वान होते. त्यामुळे प्रत्येक बाबीचा सखोल उहापोह झाला. राष्ट्र उभारणीची पायाभूत मूल्ये ठरविली गेली. विविध नेत्यांनी तत्कालीन विविध वर्गांच्या समस्यांचा विचार केला. अशा समस्यांचा भारतीय पातळीवर मुलभूत विचार करण्यात म.गांधी अग्रेसर होते. गांधीजींनी विविध विषयांबाबत आपली मते वेळोवेळी प्रदर्शित केली.

गांधी विचार कार्यावर आधारित गांधीवादाची अनुयायांनी मांडणी केली. त्यातून गांधीजींच्या विविध विषयांबाबतच्या भूमिकांवरही प्रकाश पडतो. ''गांधीवाद म्हणजे एखादा सिंध्दांत नव्हे किंवा मतांचा व नियमांचा समूह नव्हे तर जीवनाचा तो एक दृष्टिकोन आहे. जीवनाची एक शैली आहे. मनुष्याच्या जीवनातील समस्यांचे निराकरण करणारी ती पध्दती आहे.''1 गांधीजींनी मजूरांच्या समस्या केवळ मांडल्या नाहीत तर त्या सोडविण्यासाठी प्रयत्नही केल्याचे दिसून येते.

गांधीजींचे मजूर विषयक विचार

मजुरांच्या न्याय हक्कांसाठी गांधींनी वारंवार आवाज उठविला. अहमदाबादच्या मजूर लढण्याबाबत माहिती मिळाल्यावर गांधीनी लवाद नेमण्याबाबतची विनंती केली. ती मागणी मालकांनी फेटाळली. मालकांशी चांगले संबंध असूनही गांधींनी मजुरांना लढयासाठी मार्गदर्शन करत संपाचा सल्ला दिला. यापूर्वीच्या अनेक संपांपेक्षा गांधींच्या मार्गदर्शनातील हा संप आगळा वेगळा होता. संप शांततेतच झाला पाहिजे. संपात उतरण्याची सक्ती कोणाही कामगारावर करावयाची नाही. कुणीही भिक्षेवर जगायचे नाही व संप लांबला तरी मागण्यांवर दृढ रहायचे अशी मार्गदर्शक तत्त्वे गांधीजींनी घालून दिली होती.2 त्यानुसार संप झाला; पण हळूहळू त्यातील जोम ओसरू लागला. मजुरांत द्वेश–भावना निर्माण होऊ लागली. म्हणून गांधींनी स्वतः उपवासाचा मार्ग पत्करला व लढा यशस्वी केला व वर्गीय संबंधही सुधारले.

अन्याय निवारण्यासाठी संप करावा ; त्याचा नेता मजुरांमधीलच असावा ; संपाचा हेतू राजकीय व आर्थिक असा दुहेरी असू नये; असा संप शांततामय अहिंसक मार्गानेच व्हावा पण लवादाचे तत्त्व मान्य झाल्यास संप करू नये असे त्यांचे मत होते. साधनशुचितेस त्यांनी मोठया प्रमाणावर महत्त्व दिले. तसेच संप काळात मजुरांच्या उपजीविकेचा प्रश्न सोडविण्यासाठी त्यांना मजुरी मिळावी यासाठी त्यांनी साबरमती आश्रमात मजुरांना काम उपलब्ध करून दिले होते. भिक्षान्नावर मजुरांनी जगु नये हा त्यांचा आग्रह होता.

अहमाबाद संप यशस्वी झाल्यावर तेथे 'मजूर महाजन संघटना' गांधीजींनी उभारली.'' प्रत्येक कामगाराच्या अगणित अडचणी व गाऱ्हाणी असतात ती दूर व्हावीत असे त्याला वाटते. संघ स्थापन झाल्यामुळे त्यांच्या अधिकाऱ्यांशी वाटाघाटी करणे व समेट घडवून आणणे अधिक सोपे जाईल. यात दोंन्ही पक्षांचे कल्याण आहे. म्हणून तुम्ही हे काम पूर्ण विचाराने व जाणीवेने हाती घ्यावे.''3 असा उपदेश त्यांनी मजुरांना केला. त्यांची संघटना राजकारापासून अलिप्त होती. गांधींना असे वाटत असे की, मजुरांत जोपर्यंत सामाजिक जाणीवा जागृत होत नाहीत, तोपर्यंत राजकीय कामासाठी त्यांचा वापर होऊ नये. उपजीविकेबाबत अनेक समस्या सुटेपर्यंत, मजुरांच्या विचाराच्या कक्षा रूंदावत नाहीत, जोपर्यंत देशाच्या सद्यःस्थितीची यशोयोग्य जाण त्यांना येत नाही, तोपर्यंत त्यांनी राजकीय कार्यापासून दूरच रहावे. मजुरांना आपले हक्क व ते कसे बजावावेत याचे ज्ञान यावे यासाठी त्यांना लेखन, वाचन, गणन या तीन 'न' कारांचे ज्ञान दिले पाहिजे याबाबत गांधी आग्रही होते.

भांडवलदार व मजूर भांडणे मिटावी. संपत्तीचे केंद्रीकरण टाळावे. कारण विषमतेमुळे अहिंसात्मक राज्यपध्दती अशक्य बनते. विषमतेस गांधीजींचा विरोध होता. विषमतेतून शोशण येते. विषमता दूर करण्यास हिंसात्मक दबाव उपयोगी नाही तर अहिंसक मार्गाने मतपरिवर्तन हा मार्ग आहे. असे गांधीजींना वाटत होते. '' दक्षिण आफ्रिका, चंपारण्य किंवा अहमदाबाद येथे मी जी कामगारांची संघटना हाती

Please cite this Article as : *किशोर जनार्दन लांडेपाटील , गांधीजींचे मजूर विषयक विचार* **: Indian Streams Research Journal (June ; 2012)**

घेतली तीत भांडवलदारांविषयी वैरभाव मुळीच नव्हता. त्या प्रत्येक प्रकरणी आवश्यक तितकाच प्रतिकार केलेला होता आणि तो पूर्णपणे यशस्वी झाला. (संपत्तीची) समान वाटणी हे माझे ध्येय आहे. पण मला जे दिसते आहे त्यावरून ते ते साध्य होईल असे मला वाटत नाही, म्हणून मी न्याय्य वाटणीसाठी प्रयत्न करीत आहे.''5 बाळासाहेब भारदे यांनी म्हटल्यानुसार,'' वर्गविग्रहापेक्षा वर्गसमन्वयाच्या भूमिकेतून पण सत्याग्रहाच्या साधनेतून या असह्य वर्गभेदावर मात करता येईल हा विश्वास गांधीजींनी श्रमजीवी वर्गात निर्माण केला.''6 वसंत पळशीकर म्हणतात, '' शोषणमुक्त समताधिष्ठित सामाज खऱ्या अर्थाने अस्तित्वात यावयाचा असेल तर समाजातील प्रत्येकाने (उत्पादक) शरीरश्रम करावयास हवेत या निष्कर्षावर ते पोचले.''7 शरीरश्रमाला त्यांनी खूप महत्त्व दिले. प्रत्येकास प्रतिष्ठित रोजगार मिळायला हवा असा त्यांचा आग्रह होता. प्रत्येकाला काम मिळावे ज्यातून जीवन जगण्यास पुरेसे उत्पन्न मिळावे. भांडवलदारांनी हे समजून घ्यावे. गांधीजींच्या मते '' आपल्या संपत्तीइतकेच त्यांचे श्रम हेही भांडवल आहे आणि आपल्याला किती मजुरी मिळावी हे सांगण्याचा त्यांना हक्क आहे. त्यांच्या गरजा, त्यांच्या कामाचे व विश्रांतीचे तास आणि त्यांच्या राहणीचा दर्जा या दृष्टीने आपण विचार करण्याची वेळ आता आली आहे.'' 8 बेकारांच्या रोजगारासाठी त्यांनी ग्रमोद्योगांना प्राधान्य दिले. ग्रामीण अर्थकारण अर्थपूर्ण होण्यासाठी ग्रामोद्योग महत्त्वाचे होते. अल्प भांडवल, किमान कौशल्याच्या आधारावर ग्रामद्योग सुरू करणे शक्य होते. दारिद्रय, बेकारी, उपासमार यावर तो प्रभावी उपाय ठरतो.

गांधीजींनी यंत्राला विरोध केला. याचा अर्थ उद्योगीकरणास त्यांचा विरोध नव्हता. उद्योगाकडे औद्योगिक दृष्टिकोनातून नाही तर सामाजिक दृश्टिकोनातून गांधी पहात. उद्योगांची रोजगारक्षमता व त्याचा समाजावर होणारा परिणाम यांचा विचार ते करत. उद्योगातून बेकारी वाढू नये. यंत्रामुळे मात्र ती वाढते. एवढेच नव्हे तर यंत्रामुळे विषमता वाढून गुलामगिरीस चालना मिळते नैतिक, आध्यात्मिक पतन होते. म्हणून त्यांचा यंत्रास विरोध होता. आवश्यक लोकांना काम देऊन यंत्राचा वापर होण्यास त्यांची हरकत नव्हती. गांधींजी म्हणतात, ''यंत्रावर मार्यदा असावी. यंत्रे माणसाच्या कह्यात असावीत. ती त्याला सहाय्यक असावीत आणि उत्पादन विकेंद्रीत स्वरूपात केले जावे या आग्रहामागे सर्व सामान्य माणसाला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याची थोर दृष्टी होती. केंद्रीभूत कारखान्यामध्ये यंत्राच्या साहाय्याने प्रचंड प्रमाणित वस्तूंचे उत्पादन केले जाते. तेथे उत्पादक कामगार हा कवडी मोलाचा ठरतो. यंत्रे अतिशय महागडी व नाजूक असल्याने ती जास्त काळजीपूर्वक जपली जातात. (त्यांच्यासाठी खोल्याही वातानुकूलित बनविल्या जातात.) उत्पादनापेक्षा ते महाग दराने सर्वदूर विकून पैसा करण्यास महत्त्व येते. जाहिरातबाजी, दलाली, व्यापारी हिम्मत, बनवाबनवी यांना महत्त्व येते अनीती, भ्रष्ट्राचार व असत्य बोकाळते.''9 याबरोबरच ''औद्योगिकीकरण व यंत्राचा दुराग्रह यांना त्यांचा असलेला विरोध मुख्यतः मानवी जीवनाच्या शांत व सभ्य चौकटीला धक्का पोहचू नये यासाठीच होता''10 श्रमाला महत्त्व देताना श्रमाला भांडवलाइतका दर्जा व प्रतिष्ठा मिळावी अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. कामगारांच्या स्थितीत सुधारणा होण्याबाबत काय झाले पाहिजे, या संदर्भात 1927 मध्ये सिलोन दौऱ्यात कोलंबो येथील भाषणात गांधीजींनी कामगांरांना सवड मिळावी इतपत कामाचे तास असावेत. त्यांना शिक्षण घेण्याच्या सोयी मिळाव्यात. कामगार मुलांना दुधाचा व कपडयाचा योग्य पुरवठा व्हावा आणि आवश्यक ते शिक्षण मिळण्याची तरतूद असावी. त्यांच्यासाठी आरोग्यशीर घरे असावीत. तसेच कामगारांना वार्धक्याची तरतुद करता यावी इतकी मिळकत असावी. असे विचार व्यक्त केले.11

समारोप

थोडक्यात गांधीजींनी मजुरांच्या समस्यांचा निव्वळ विचार केला नाही तर त्याविरूद्ध आवाजही उठविला. गांधीजींना मजूर, मजुरांच्या समस्या व त्यांचे हक्क तसेच त्यांचे समाजातील स्थान व महत्त्व यांचे वास्तव ज्ञान होते. भारतीय व्यवस्थेत मजुरांच्या समस्या वाढू नयेत यासाठी त्यांनी यंत्रालाही विरोध केल्याचे दिसते. अर्थात त्यांचा विरोध यंत्राला नसून त्याच्या परिणाम स्वरूप मजुरांच्या वाढत्या समस्यांना होता. तसेच या समस्या सोडविण्यासाठी लढयाची त्यांची तयारी होती. वर्गीय संबंध सुधारण्याच्या संधी न दवडता लढा दयायचा व अशा लढयात साधनशुचितेला मात्र त्यांनी दिलेले महत्त्व लक्षणीय होते.

संदर्भ

1. मनोज बोरगावकर, स्वातंत्र्यपूर्वकालीन राजकीय प्रवाह, पुस्तक दुसरे, य.च.म.मु.वि.,पृ. 32.
2. अधिक चर्चेसाठी पहा– मो.क.गांधी, सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा, अहमदाबाद, 1969, पृ.407.
3. दा.न.शिखरे (संपा. व अनु.), गांधी विचार दर्शन : अर्थकारण, खंड 13वा, पुणे. 1993, पृ.144.
4. कित्ता, पृ.133
5. कित्ता, पृ.132.
6. बाळासाहेब भारदे, गांधी विचार मीमांसा, पुणे, 1993, पृ.59.
7. वसंत पळशीकर, 'गांधीजींचा जीवन विचार', समाविष्ट नागोराव कुंभार (संपा.), महात्मा गांधीः विचार दर्शन, लातूर, 1995, पृ.10.
8. दा.नं. शिखरे, पूर्वोक्त, पृ.136.
9. वसंत पळशीकर, पूर्वोक्त, पृ.11.
10. प्रमोद बियाणी, 'आजच्या संदर्भात महात्मा गांधी', नवभारत, वाई, एप्रिल मे, 1969, पृ.19.
11. मूळ भाषणाच्या संदर्भासाठी पहा – दा.नं.शिखरे, पूर्वोक्त, पृ.143.

Please cite this Article as : *किशोर जनार्दन लांडेपाटील , गांधीजींचे मजूर विषयक विचार* **: Indian Streams Research Journal (June ; 2012)**